
# लोकप्रबोधनकार
# अण्णा भाऊ साठे

संपादक

डॉ. रामशेट्टी शेटकार

प्रा. बालाजी शिंदे



**Lokprabodhankar Anna Bhau Sathe**
**Editor : Dr. Ramshetti Shetkar,**
**Prof. Balaji Shinde**

**लोकप्रबोधनकार अण्णा भाऊ साठे**
**संपादक : डॉ. रामशेट्टी शेटकार,**
**प्रा. बालाजी शिंदे**

**Paper Back**
**ISBN 978-81-945948-2-6**
**E-Book**
**ISBN 978-81-945948-3-3**

**प्रभाकर पब्लिकेशन**
३०४, विंग-सी, सिद्धीविनायक अपार्टमेंट,
सुतमील रोड, लातूर
मो. ८६००८८११२७, ८१४९१५३०१८

© सर्व हक्क
**संपादकाधीन**

प्रथमावृत्ती
**१ जानेवारी २०२१**
**(अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त)**

मुद्रक
**आर्टी ऑफसेट, लातूर**

अक्षर जुळवणी
**रोहित टायपिंग सेंटर, लातूर**

मुखपृष्ठ रेखाटन
**शिवाजी हांडे**

**₹ - ३६०/-**

*सूचना : या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व संपादकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या ग्रंथातील लेखकांच्या मताशी संपादक, प्रकाशक, मुद्रक, वितरक सहमत असतीलच असे नाही.

भाग - ७

'माकडीचा माळ' : भटक्यांचे भावविश्व

३४. भटक्या-विमुक्तांचे दुःखानुभव : 'माकडीचा माळ' / २०९
डॉ. राहुल खरात

३५. 'माकडीचा माळ' कादंबरीचे सामाजिक आकलन / २१५
डॉ. अतुल चौरे

३६. भटक्या - विमुक्तांच्या अस्तित्वाचा संघर्ष : 'माकडीचा माळ' / २१९
डॉ. सोपान सुरवसे

भाग - ८

अण्णा भाऊ साठे यांचे कथासाहित्य

३७. 'कृष्णाकाठच्या कथा' या कथासंग्रहातील वास्तव स्त्रीजीवन / २२५
प्रा. विजया लोखंडे

३८. अण्णा भाऊ साठे यांचे दलित कथेतील योगदान / २२९
डॉ. हरिश्चंद्र गायकवाड

३९. 'रानगा' या कथासंग्रहातील निसर्गचित्रण / २३२
डॉ. संगीता पैकेकरी

भाग - ९

अण्णा भाऊ साठे यांचे नाट्यलेखन

४०. 'इनामदार' नाटकातील भाषावैभव / २३७
डॉ. व्यंकटी पावडे

भाग - १०

अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय

४१. अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी ललकारी / २४३
प्रा. बालाजी शिंदे

४२. महाराष्ट्राची शाहिरी परंपरा आणि अण्णा भाऊ साठे यांचे योगदान / २४८
प्रा. श्रीकांत मुद्दे

४३. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रबोधनपर
शाहिरीची मूल्यात्मक जाणीव / २६२
प्रा. वैभव कांबळे

४४. अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी आणि लोकनाट्य / २६५
डॉ. गजेंद्र रंदील

भाग - ११
अण्णा भाऊ साठे यांची लोकनाट्य

४५. अण्णा भाऊ साठे यांची लोकप्रबोधनकारी लोकनाट्य / २७१
डॉ. सुदाम पवार

४६. लोकनाट्याचे जनक : अण्णा भाऊ साठे / २७७
प्रा. वसंत बंडे

भाग - १२
प्रवासवर्णन : 'माझा रशियाचा प्रवास'

४७. प्रतिभावंत साहित्यिकाचा प्रवास : 'माझा रशियाचा प्रवास' / २८७
डॉ. वंदना शिंदे

४८. 'माणूस' शोधाचा प्रवास : 'माझा रशियाचा प्रवास' / ३००
प्रा. धनंजय भाट

भाग - १३
अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी व चित्रपटनिर्मिती

४९. 'अलगुज' : कादंबरी ते चित्रपट / ३०५
डॉ. गोविंद काळे

भाग - १४
अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्य

५०. लोकराज्याचे पुरस्कर्ते : अण्णा भाऊ साठे / ३१५
प्रा. रश्मी देसाई

५१. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मूल्ये / ३२४
डॉ. संग्राम टेकले

५२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची लेखनशैली / ३३०
प्रा. संतोष कांबळे

५३. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यलेखनाचे वेगळेपण / ३३३
डॉ. विद्यादेवी कांबळे

# ३८.

## अण्णा भाऊ साठे यांचे दलित कथेतील योगदान

डॉ. हरिश्चंद्र गायकवाड

दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्ववादाला प्राधान्य मिळाले. मनोविश्लेषणवादानंतर कथा, कादंबरी क्षेत्राने अनेक वळणे घेतली. त्यात आपल्यापरीने दलित साहित्यिकांनी दलित कथा, कादंबरी निर्मितीत आपला मोलाचा वाटा उचललेला दिसतो. दलित कथा, कादंबरीकारांमध्ये अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा. शेंडे, नामदेव व्हटकर, केशव मेश्राम, ना.बं. जाधव, हिं. गो. बनसोडे, ज.वि. पवार, हरिभाऊ पगारे, निशिकांत शेंडे, भीमसेन देठे, भि.शि. शिंदे, सुधाकर गायकवाड, बाबूराव बागुल, नामदेव ढसाळ, अशोक व्हटकर, मुरलीधर भोसेकर यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, ३ नाटकं, १ प्रवासवर्णन आणि शाहिरी, पोवाडा, लावणी अशी अनेक गाणी लिहिली. म्हणूनच त्यांना 'साहित्यसम्राट' म्हणतात. याशिवाय दलित कादंबरीकारांमध्ये अण्णा भाऊ साठे यांचा सर्वप्रथम उल्लेख केला जातो.

अण्णा भाऊंच्या 'वारणेच्या खोऱ्यात', 'अलगुज', 'आवडी ', 'मयूरा', 'वारणेचा वाघ', 'पाझर', 'रानगंगा', 'केवड्याचं कणीस', 'मंगला', 'वैर', 'कुरूप', 'अहंकार', 'रूपा' या कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे, तर 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता', 'चंदन', 'माकडीचा माळ', 'गुलाम', 'चिखलातील कमळ', 'रानबोका', 'आघात', 'डोळे मोडीत राधा चाले', 'रत्ना' या कादंबऱ्यांमध्ये दलित जीवनाचे चित्रण आले आहे. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबरी लेखनाचा वेग व पसारा मोठा होता, ते स्वत: दलित समाजातील होते. त्या समाजातील माणसांची सुखदुःखे त्यांनी स्वतः भोगली होती, त्यामुळे अनुभवांचे समृद्ध भांडार त्यांच्याजवळ होते. त्यांना कादंबरी लेखनाची धाटणीही अवगत होती.

अण्णा भाऊ साठे यांच्यानंतर शंकरराव खरातांचा आवर्जून उल्लेख केला जातो. त्यांच्या 'हातभट्टी', (१९७०) 'मी मुक्त!, 'मी मुक्त!', 'झोपडपट्टी', 'गावचा टिनोपाल गुरूजी','मसालेदार गेस्ट हाऊस', 'पारधी' (१९८०), 'फुटपाथ नं. १' (१९८०) या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'मसालेदार गेस्ट हाऊस' मध्ये शहरातील गेस्ट हाऊसचे चित्रण आहे. शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'मी मुक्त!, 'मी मुक्त!, 'पारधी', 'फुटपाथ नं. १' या

कादंबऱ्यांमध्ये दलित जीवनाचे चित्रण आले आहे. शंकरराव खरात एखादा विषय, उद्दिष्ट समोर ठेऊन कादंबरीची रचना करताना दिसतात. उदा. हातभट्टीमुळे नान्या व त्याचे सर्व कुटुंब कसे उद्ध्वस्त होते, ते 'हातभट्टी' मध्ये दाखवितात. याशिवाय झोपडपट्टी व फुटपाथवरील बकाल जीवनाचेही दर्शन 'हातभट्टी', 'फुटपाथ नं.१' मध्ये घडते.

**दलित कथा :** मराठी कथेची विविध रूपे पाहत असताना मराठी कथेच्या घाटाची, नव्हे तिचेच एक रूप म्हणून 'दलित कथा' आपणापुढे येताना दिसते. दलित कथेच्या वाटचालीत अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा. शेंडे, बंधुमाधव या दलित कथाकारांची कथा समोर येते. याचबरोबर दलित कथाकारांमध्ये बाबूराव बागुल, केशव मेश्राम, वामन होवाळ, अर्जून डांगळे, योगिराज वाघमारे, अमिताभ, योगेंद्र मेश्राम यांचा आवर्जून उल्लेख केला जातो.

**अण्णा भाऊ साठे :** दलित कथेचा विचार करताना अण्णा भाऊ साठे यांची कथा सर्वप्रथम आपणासमोर येते. अण्णा भाऊंनी दलितांचे जीवन प्रत्यक्ष पाहिले होते, भोगले होते. त्यांना घरची अत्यंत गरीबी असल्यामुळे पोटासाठी कोळसे वाहणारा हमाल, घरगडी, हेलकरी, गिरणी कामगार अशी अनेक कामे करावी लागली. त्यांनी १९४९ मध्ये कथा लिहावयास सुरूवात केली. त्यांचा पहिला कथासंग्रह 'खुळंवाडी' १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'बरबाद्या कंजारी' (१९६०), 'भानामती' (१९६२), 'फरारी' (दु.आ.१९७९), 'कृष्णाकाठच्या कथा' (१९६४), 'गजाआड' (१९६७), 'गुऱ्हाळ' (१९६९), 'जिवंत काडतूस' (दु.आ.१९७७), 'नवती' व 'चिरागनगरची भुतं' (१९७८) हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. 'मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच मी लिहितो अशी त्यांची कथा निर्मितीमागील भूमिका होती.

**कथेचे अंतरंग :** अण्णा भाऊंची 'विष्णुपंत कुलकर्णी' ही कथा १९१८ च्या दुष्काळात घडलेल्या एका सत्य घटनेवर आधारित आहे. 'उपकाराची फेड' मध्ये अस्पृश्यांमधील उच्च-नीचतेच्या कल्पनेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. 'बिलवरी' मध्ये बिलवरी या सुस्वरूप डोंबारी तरूणीचे व येलापूरच्या इमानदाराचा नोकर अमीत याचे प्रेमप्रकरण उभे करण्यात आले आहे. याशिवाय रायनाक गावासाठी धारातीर्थी पडला, त्याच्या वंशजांना भंडाऱ्याचा नीट प्रसादही मिळू नये, ही खंत 'थडग्यातील हाडं' या कथेत व्यक्त होताना दिसते.

'वळण' मध्ये महार समाजातील जुन्या-नव्या पिढीचा संघर्ष दाखविण्यात आला आहे. जनावराचे मांस खाण्याच्या प्रश्नावरून चिमा महारीण व महारवाडा तसेच महारवाडा व मांगवाडा यातील संघर्षाचे चित्रण या कथेत आले आहे. अण्णा भाऊंच्या कथांमध्ये ग्रामीण भागातील दलित जीवनाचे तसेच शहराच्या झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण आले आहे. त्यांनी 'बरबाद्या कंजारी' मध्ये झोपडपट्टीचे जग उभे केले आहे. त्यात झोपडपट्टीत कानमळ काढून त्यावर उदरनिर्वाह करणारा 'बरबाद्या कंजारी' पहावयास मिळतो. त्याची मुलगी निल्ली पळून गेल्यामुळे

त्याला जातपंचायतीपुढे उभे करण्यात येते. पण बरबाद्या जातपंचायतीविरूद्ध बंड करतो. भीमाला पोटापाण्यासाठी धडपडताना दोन बोटे गमवावी लागल्याची घटना 'स्मशानातील सोनं' मध्ये आली आहे, तर चिरागनगरच्या झोपडपट्टीत भुतांना मागे टाकणारी मोरे, शेट, मंकी, चंगीजखान, सखाराम व पांडुरंग हे आंधळे, येसू, परमू, भास्कर, लखपती ही माणसे भेटतात. येथे दारू आणि गांजा हे जीवनाचे अविभाज्य अंग झाले आहे, तर मारामाऱ्या आणि तुरूंग या जीवनातील दैनंदिन घटना बनल्या आहेत, याचे चित्रण आहे.

**पोटाची लढाई :** अण्णा भाऊंनी कथेत उभी केलेली माणसे पोटासाठी धडपडताना दिसतात. 'स्मशानातील सोनं' मधील भीमा पोटाचा प्रश्न मिटविण्यासाठी रात्री-अपरात्री स्मशानात जाऊन मढी उकरून काही मिळते का? ते पाहण्यासाठी धडपडताना दिसतो. 'सुलतान' या कथेतील सुलतान पोटासाठी धडपडताना दिसतो. तो म्हणतो, 'मला पोटभर हवं, मी या पोटासाठी लढणार.' 'थडग्यातील हाडं' मध्ये गावकऱ्यांच्या उष्ट्या खरकट्यासाठी ताटकळत बसलेले महार-मांग पाहावयास मिळतात.

**अन्यायाविरूद्ध लढणारी माणसे :** अण्णा भाऊंच्या कथांमधील माणसे अन्यायाविरूद्ध लढताना दिसतात. ती आपल्या भावना रोखठोक बोलून दाखवितात. जे कृतीने करावयाचे आहे, त्याचा उच्चार त्यांच्या बोलण्यातून होताना दिसतो. 'विष्णुपंत कुलकर्णी' मध्ये विष्णुपंत निक्षून सांगतात, 'साहेब, जर दुष्काळाचा आणि साथीचा बंदोबस्त झाला नाही तर प्रत्येक माणसाला कुत्र्याच्या मौतीनं मरावं लागेल आणि मी कुत्र्यासारखा मरणारा माणूस नाही साहेब!" म्हणजेच, जगण्यासाठी लढणारी माणसे अण्णा भाऊंच्या कथेत आहेत.

**जुन्या वळणाची कथा :** डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "अण्णा भाऊंची कथा तशी पारंपरिक, जुन्या वळणाची. ते एकापुढे एक घटना मांडत जातात आणि त्यातून एकात्म परिणाम साधतात." अण्णा भाऊंच्या कथालेखनामागे तोच आदर्श असावा असे वाटते.

**अण्णा भाऊंच्या कथेची वैशिष्ट्ये :** १) अण्णा भाऊंनी जीवनानुभूतीतून कथानिर्मिती केली. २) त्यांच्या कथांतून दलित जीवन, झोपडपट्टी व तुरूंगातील कैद्यांचे जीवन चित्रित झाले आहे. ३) त्यांनी कथेत उभी केलेली माणसे पोटासाठी धडपडताना दिसतात. ४) त्यांच्या कथांमधील संवाद बोलके आहेत. ५) अण्णा भाऊ साठे दलित कथेचे शिल्पकार आहेत.

**संदर्भ :**

१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्राचार्य डॉ. वसंत बिरादार
२) साहित्याचे संदर्भ : हरिश्चंद्र थोरात
३) मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहासः डॉ. विद्यासागर पाटंगणकर

❖ ❖ ❖